Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 3RD NOVEMBER 1898.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख ८ माहे आक्टोबर, सन १८९८.

नंबर ६४१६.—हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) याच्या ९ व्या व ७ व्या कलमांवरून दिलेले अधिकार चालवून ज्या कित्येक सुधारणा करण्याचें योजिलें आहे त्यांचा खालीं दिलेला मसुदा, सदरहू आक्टाचें कलम १८ व हिंदुस्थान सरकारचा होम डिपार्टमेंटांतील जाहिरनामा नंबर १९६४, तारीख २ माहे सप्टेंबर सन १८८७, यांत फर्माविल्याप्रमाणें, सदरहू सुधारणा ज्या मनुष्यांस लागू होण्याचा संभव असेल त्यांच्या माहितीसाठीं, प्रसिद्ध केला आहे; आणि यावरून असें कळविण्यांत येत आहे कीं या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिना संपल्यावर आलीजाह् गव्हर्नर इन् कौन्सिल यांजकडून सदरहू मसुद्याचा विचार करण्यांत येईल.

२. सदरहू एक महिना संपण्यापूर्वी सदरहू मसुद्याच्या संबंधानें कोणत्याहि मनुष्याकडून जी कोणतीहि हरकत किंवा सूचना येईल तिचा आलीजाह् गव्हर्नर इन् कौन्सिल यांजकडून विचार करण्यांत येईल.

मसुदा.

हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) याच्या ९ व्या कलमावरून दिलेले अधिकार चालवून व गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल याची पूर्वी मंजूरी घेऊन, आलीजाह् गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं, सरकारचा जाहिरनामा नंबर ९९७९, तारीख २६ माहे जूलै सन १८९७, याअन्वयें छापून प्रसिद्ध करण्यांत आलेल्या, मुंबई इलाक्यांत बारी पदार्थ तयार करणें, कबज्यांत ठेवणें व विकणें यांचें नियमन करण्याविषयींच्या कानूंमध्यें खालील मजकूर ज्यास्त वाढविला आहे:

१. १२ व्या कानूनंतर कानू १२ अ ह्मणून खालील मजकूर दाखल करावा, ह्मणजे:—

"१२ अ. बारी पदार्थ तयार करण्याविषयींचा जो कोणताहि लैसेन्स देण्यास १२ व्या कानूअन्वयें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची एखादा मंजूरी मिळाली असेल तो लैसेन्स नवीन करून देण्याचा किंवा सुधारण्याचा स्थानिक सरकारास अखत्यार आहे: मात्र असें ठरविलें आहे कीं (१) याप्रमाणें नवीन करून दिलेल्या किंवा सुधारलेल्या लैसेन्सावरून; मूळच्या लैसेन्सांत निर्दिष्ट केलेल्या बारी पदार्थांशिवाय इतर कोणताहि बारी पदार्थ तयार करण्याचा अधिकार प्राप्त होतां नये, (२) याप्रमाणें

नवीन करून दिलेला किंवा सुधारलेला दरेक लैसेन्स प्रथमतः धारी पदार्थांच्या इन्स्पेक्टरानें पसंत केला पाहिजे, आणि (३) याप्रमाणें नवीन करून दिलेला दरेक लैसेन्स पराकाष्ठा एक वर्षापर्यंतच्या मुदतीचा असला पाहिजे."

२. १३ व्या कानूंत "दिला असेल" या शब्दांनंतर "किंवा नवीन करून दिला असेल" हे शब्द दाखल करावे.

आलीजाह् नेक नामदार गव्हर्नर साहेब बहादूर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही) जे. डब्ल्यू. पी. म्यूर-माकेन्झी,

सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

---

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.